# ती आणि मी



## सुचित मुंडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# ती आणि मी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# ती आणि मी

A Dreams trek

(लघुकादंबरी)

लेखक :

सुचित सुर्यकांत मुंडे

लेखकाची ओळख-



नमस्कार. मी सुचित सुर्यकांत मुंडे. डाबी हे बीड जिल्ह्यातील, परळी वैजनाथ तालुक्यातील, माझं छोटंसं गाव. कोकणातील आयओपीई, बाटू, लोणेरे, रायगड मधून विद्युत अभियांत्रिकी मधे डिप्लोमा पूर्ण केला. आता एमआईटी, औरंगाबाद इथे तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी मध्ये शिकत आहे. सोबतच कॉलेजच्या कल्चरल सेक्रेटरी या पदावर कार्यरत आहे.

बालपण छोट्याश्या गावात गेले. लहानपणापासून सांस्कृतिक कार्यक्रम आणि सांप्रदायिक कुटुंबाचा वारसा असल्याने ग्रंथांचा सहवास लाभला.

कविता लिहायची आवड आहे. प्रेमकवी अशी मूळ ओळख आहे. सोबतच सामाजिक विषयांवर लेख वगैरे लिहितो. लेखक म्हणून या कादंबरीतून पदार्पण करत आहे.

वाचन आणि लिखाणाचा छंद आहे. शिवाय सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करायला आवडतं.

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

सुचित सुर्यकांत मुंडे

9673621212

suchitmunde@gmail. com

https://m. youtube. com/channel/UCV36uMwyb5yZEClteeoeQNg

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

www. esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP :

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन : २५ ऑगस्ट २०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मनोगत

आयुष्यात एकदातरी कोणावर प्रेम होत असतं. एखादा चेहरा आवडायला लागतो आणि मग तोच चेहरा आपलं सर्वकाही होऊन जातो. प्रत्येक प्रेम प्रकरणाची स्टोरी वेगळी असते, पण भावना सारख्याच.

कॉलेजमधे खुप प्रेमप्रकरणं असतात, एकतर्फ़ीसुद्धा. कधी बोलायला उशीर होतो तर कधी समजायला. काही आठवणींनी रंगलेले तर काही तशेच कोरे.

प्रत्येक प्रेमाला यश मिळतंच असं नाही, काही अपूर्ण असतात आणि राहतातही तश्याच. खुप काही नवीन मिळतं, खुप काही गमवावं पण लागतं. शेवटी काही राहो न राहो आठवणी मात्र राहतात.

ही लवस्टोरी तशीच काहीशी आहे. शिवा, काजल आणि अस्मिताच्या प्रेमाची. माझी ही पहिली कादंबरी “ती आणि मी” अश्याच कॉलेज मधील जीवनाचा प्रवास.

आपण त्या गोष्टी छानपणे मांडू शकतो ज्या नेहमी पाहतो, अनुभवतो आणि जगतो. हा पहिला प्रयत्न आहे. तुम्हाला ही कादंबरी नक्की आवडेल, फक्त तुमच्या प्रतिक्रिया द्यायला विसरु नका.

सुचित मुंडे

9673621212

suchitmunde@gmail.com

# अर्पणपत्रिका

**प्रेमावर विश्वास असणाऱ्या प्रत्येकास....**

कल्पना वास्तवावर आधारित असते. या कथेचे कदाचित वास्तविक व्यक्ती, स्थळ, नाव, घटना यांच्याशी साम्य असू शकते. पण ही कथा केवळ माझी कल्पनाच असून तसं काही वास्तवात असेल तर निव्वळ योगायोगच....

# ती

# आणि

# मी

A Dreams trek

# प्रकरण एक: ती

“अगर किसी चीज़ को दिल से चाहो तो पूरी कायनात उसे तुमसे मिलाने में लग जाती है” फिल्मी स्वरात निखिल बोलला.

शिवा वेड्यासारखा हसत होता.

वाढदिवसाच्या पार्टीमधील हे चित्र पाहून बाकीचे सर्व शिवाकडे पाहत होते.

खरं प्रेम... इतकं सोपं नसते रे ते फक्त ऐकायला बरं वाटतं, चित्रपटात दाखवतात तसं खऱ्या आयुष्यात नसत. प्रत्येकाला वाटतं आपल्या आयुष्यात एक 'ती' असावी, आपली काळजी करणारी, सतत आपल्याविषयी विचार करणारी, आयुष्याच्या चित्रात रंग तिने भरावे, तिच्या प्रेमाच्या छायेत आयुष्य जावे, प्रत्येक आनंदात नाव तिचे लिहावे. हो न? ती म्हणजे एक अशी धुन जी आयुष्यभर आठवावी, अशी सुंदर मूर्ती जी आयुष्यभर पहावी. तिच्या चेहऱ्यावरील हास्याकरिता सगळं आयुष्य वेचावं आणि तिच्या डोळयांत पाहिल्यावर आपलं जग दिसावं अशी ती..

'झाला आमचा वेडा कवी सुरु' योगेशने टोमना मारला.

“अरे शिवा तू एवढा छान आहेस. दिसायला हीरो, खुप हुशारही आहेस आणि भावी इंजीनियर तू, तुला भाव न देणारी मुलगी वेडीच असेल बघ” दिलासा देत प्रियंका बोलली.

सगळयांच्या नजरा आता शिवाकडे फिरल्या होत्या. इतक्यात विशाल शिवाला बोलला.

शिवा, आम्हाला माहित आहे की तू कोणावर तरी खुप प्रेम करतोस. तू आम्हाला कधी तिच्याबद्दल सांगत नाहीस. मग आम्हाला कळेल तरी कसं? आणि हो आज खुप वेळ आहे आणि सगळेजण खुप उत्सुक आहेत तुझी स्टोरी ऐकायला. आज टाक बोलून.

सगळेजण शिवाला विनवत होते.

ठीक आहे. मी सांगेन पण फक्त एका अटीवर.

"अट मान्य आहे" सगळेजण क्षणभरात शिवाने अट सांगायच्या आधी बोलले.

"तुम्हाला सांगून मन मोकळे होईल. फक्त अट अशी आहे की, तुम्ही कधी तिच्या नावाने चिडवायचं नाही आणि कधीच तिच्याबद्दल वाईट बोलायचं नाही. "

सगळेजण तयार झाले आणि शिवा सुरु झाला.

तिच नाव काजल..

नावही कसं अगदी अभिनेत्री सारखं. तसंच तिच सौंदर्यही. दिसायला गोरी, थोडी उंच, थोडे मोठे डोळे, रेशमी केस, प्रवाहातील संथ पाण्याप्रमाणे संथ चाल, संथ चालीवर लयीत छुणछछुण वाजणारे पैजणं, मनाला वेडं करून सोडणारे चेहऱ्यावरील भाव, लाजाळु स्वभाव, खवळलेला समुद्रही तिचं हसणं पाहून शांत होईल इतकं गोड हसणं. नेहमी हसता असणारा तो चेहरा, हिरव्या पानावर दवबिंदु साठून कोवळया किरणांनी जसा चमकतो तसे चमकते डोळे आणि परीलाही लाजवेल अशी सुंदरता. गुलाबी पंजाबी ड्रेस मधील तिचा सिंपल लुक तर जीवघेणाच. तिला पाहून जगातील सर्वात सुंदर चेहरा पाहतोय असा भास व्हायचा. खरं म्हणजे सुंदर या शब्दाचा अर्थच तिला पाहून समजायचा. असं वाटायचं तिला पाहण्यातच पूर्ण आयुष्य घालवावं.

“प्रियंका घे जरा आदर्श आमच्या काजल अग्रवाल वाहिनीचा. सिंपल राहत जा, सिंपल मुली आवडतात मुलांना” योगेशने टोमणा मारला.

सगळेजण रागात त्याच्याकडे पाहत होते.

“गप्प रे तू, शिवा तू बोल” प्रियंकाने उत्तर दिले.

आम्ही सोबत कॉलेजला बीडला होतो, ती शहरात राहायची आणि मी बीड पासून जवळ असलेल्या छोट्याश्या गावात. नंतर आमची कॉलेजमध्ये मैत्री झाली आणि प्रेम, तेही एकतर्फ़ीच हं..

# प्रकरण दोन: पहिली भेट

त्या रात्री एक स्वप्न पाहीलं होतं....

पाण्यात पाय सोडून बसलेली एक मुलगी, जिच्या केसांमध्ये वारा वेडयासारखा झोके घेत होता, तिच्या केसांतील गजऱ्यात चांदण्या गुंफल्यात असा भास होत होता,  तिच्या पायाच्या स्पर्शाने पाण्यालाही मखमली रंग आलेला, हवेलाही पहिल्या पावसानंतर पसरणारा गंध पसरलेला आणि आणि मनाला झोंबणारा वारा माझ्या भोवताली वाहत होता. तिचा चेहरा दिसत नव्हता पण तिच्या रूपावरुन तिच्या चेहऱ्याची कल्पना मी करत होतो, इतक्यात जाग आली आणि नाराज होऊन ते स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करत मी तयार झालो.

आज कॉलेजचा पहिला दिवस... शाळेतील तास बदलून लेक्चर होणार, खुप जिवलग बालपणीचे मित्र नसणार, गावातल्या शाळेच्या खोल्या बदलून कॉलेजची इमारत असणार. गावातल्या त्या शाळेची आठवण येऊन सारे क्षण आठवत होते. कॉलेज जीवनाची सुरुवात होणार म्हणून मनात उत्सुकताही होती. नवीन मित्रमैत्रिणी, शहरातील वातावरण, मी फारच उतावीळ होतो आणि म्हणूनच वेळेआधीच वर्गात येऊन बसलो होतो. मग सुरज सोबत ओळख झाली. आमची छान

मैत्री झाली. तो बीड शहरात रहायचा. आम्ही असंच गप्पा मारत बसलो. मग लेक्चर सुरु झालं.

ते अपूर्ण स्वप्न मनात रंगवत बसलो. लेक्चरमधे मन लागत नव्हतं. इतक्यात एक खुप गोड आवाज कानावर आला.

“मे आय कम इन सर? “

आवाज ऐकताच मी तिच्याकडे पाहिलं, एकाक्षणी तर तो स्वप्नातील चेहरा असल्याचा भास झाला. तिच्या चेहऱ्यावरील तेज आणि भाव पाहून स्वप्नपरी दिसल्याचा भास झाला. मी तिला पाहतोय हे सुरजला समजलं.

“तिचं नाव काजल, आमच्या शाळेची टॉपर, आम्ही एकाच शाळेत होतो. खुप छान मुलगी आहे आणि स्वभावही खुप छान आहे तिचा. “ माझा मित्र सुरज तिच्याकडे इशारा करत बोलला.

आयुष्यात कधीच न अनुभवलेलं आज अनुभवत होतो. असं वाटतं होतं. खुप वर्षापासून काजलची वाट पाहत होतो. मग दिवसेंदिवस तिला पाहणं सुरुच होतं. कधी नजराही मिळायच्या, तिच्याकडे पाहायची जसं काही सवयच झाली होती.

एकदा इंग्लिशच्या लेक्चरला वर्गात असंच ग्रुप डिस्कशन सुरु होतं आणि काजल माझ्या समोर बसली होती.

समोर बसूनही ती डोळ्यात पाहायला तयार नव्हती. मी माझं मत मांडलं आणि काजलने माझ्याकडे पाहून एक स्माईल दिली.

पहिल्यांदाच मला हुशार असल्याचा आणि इंग्रजी येत असल्याचा अभिमान वाटला.

त्या रात्री ती स्माईल झोप येऊ देत नव्हती आणि मग ठरवलं तिच्याशी उद्या भेटून मैत्री करायची.

मी सुरजला सोबत घेतलं आणि कॉलेजमध्ये लवकर गेलो. योजनेनुसार लेक्चरच्या आधी लेडीज पार्किंग मध्ये तिला भेटायचं ठरवलं. सुरजला ती आधीच ओळखायची त्यामुळे जास्त भीती वाटत नव्हती. लेडीज पार्किंग समोरील कट्ट्यावर बसून काजलची वाट पाहत होतो.

इंट्री गेटकडे टक लाऊन पाहत होतो. अगदी सेकंदही मोजेल इतक्या वेळेस मी घडी पाहत होतो. खुप वाट पाहिल्यानंतर काजल तिच्या मैत्रिणी सोबत येताना दिसली. नेहमीसारखीच हसत आणि हळुवार चालत आली. जसजशी ती जवळ येत होती हृदयाचे ठोके वाढत होते. सुरज काजलच्या मैत्रिणीशी बोलायला लागला आणि काजल माझ्यासमोर उभी होती. आज तिला मैत्रीसाठी विचारणारच हे ठरवून बोलू लागलो. मनात थोडी भीती होतीच पण काजलच्या स्माईलने माझा विश्वास वाढवला.

“हाय, माझं नाव शिवा आहे आणि आपण क्लासमेट आहोत.”

“हाय, हा ओळखते रे मी तुला. काल खुप छान बोललास. इंग्लिश खुप छान आहे हं तुझी.”

“खरंच? थैंक यु काजल. मला तुझ्याशी मैत्री करायची आहे” जीव एकवटून म्हटलं.

“असं बोलून कुठ मैत्री होते का रे? “

“नाही. तसं नाही. पण सुरुवात तर होते ना.”

“हो का? बरं. मग आपण आता फ्रेंड्स ना? “ तिने हसत विचारलं.

“हो आणि तेही बेस्ट हं. मीही तिला प्रतिसाद देत बोललो.”

“हा. चल आता लेक्चरला लेट नको व्हायला.”

मग आम्ही क्लासरूमकडे चालत होतो. सुरज माझ्याकडे पाहून तिच्याकडे इशारा करत चिडवत होता. मी मात्र काजलच्या विचारात हरवलो होतो. तो दिवस माझ्या आयुष्यातील सोनेरी दिवसांपैकी एक होता.

# प्रकरण तीन: फ्रेंड रिक्वेस्ट

आमचं असंच नेहमी बोलणं व्हायचं पण कॉलेज मधील वातावरण जास्त फ्रैंक नसल्याने आमच एकमेकांशी भेटणं क्वचितच व्हायचं. फक्त हाय हॅलो एवढंच बोलणं व्हायचं.

अकरावी नंतर थोड्या सुट्टया होत्या आणि त्यानंतर बारावीचे क्लासेस सुरु होणार होते. त्याआधी तिला एकदा भेटावं असं वाटलं. तिला रोज पाहायची झालेली सवय आणि हळूहळू वाढत चाललेलं प्रेम यापुढे तिला न पाहण्याची कल्पना माझ्याकडून होत नव्हती. मग पेपर संपल्यावर क्लासरूम बाहेर आमची भेट झाली.

काजल: अरे शिवा, पेपर कसा होता?

मी: छ्यान होता. तुला तर खुप मस्त गेला असेल यात शंका नाही.

काजल: हो. तसा सोप्पा होता.

मी: काजल, तुझ्याकडे मोबाइल तर नाहीये मग सुट्टीत आपला संपर्क कसा होईल?

काजल: आपण फेसबुक वर बोलुयात ना.

मला माहित होतं ती फेसबुक वर नाहीये, मी खुप वेळा तिचं नाव शोधलं होतं.

मी: तू आहेस फेसबुक वर?

काजल: हो. पण हल्ली मी वापरत नाही. डिएक्टिवेट आहे. मी तुला रिक्वेस्ट पाठवते.

मी: ठीक आहे. मी वाट पाहतोय हं.

घरी कोणाच्यातरी फोनवर वापरत असेल कदाचित. पण मला एवढया दिलेल्या प्रतिसादावरुन तिच्या मनात काहीतरी आहे असं वाटत होतं.

नेहमीच तिच्याशी कितीही वेळ बोलत बसावं वाटत असे. पण वेळेने कधीच तेवढी वेळ मला दिली नव्हती.

मी फेसबुकवर काजलच्या रिक्वेस्टची वाट पाहत बसलो होतो. एक फ्रेंन्ड रिक्वेस्ट आली आणि एका सेकंदाच्या आत अक्सेप्ट.

मग आमचं फेसबुक वर बोलणं सुरु झालं. एकमेकांच्या आवडी-निवडी, आठवणी इत्यादी शेयर होत होत्या. मेसेज वाचताना ती डोळ्यासमोर उभी राहायची आणि मला साक्षात बोलतेय असा भास व्हायचा.

गावातील देवाच्या मंदिरातील चकरा वाढायला लागल्या आणि पुन्हा पुन्हा मी काजलला देवाकडे मागत होतो. आता फक्त मोबाईलच नाही तर माझ्या सगळ्या आयुष्याचा पासवर्ड ती होती.

# प्रकरण चार: स्वप्न.

डोळे उघडून पाहतात आणि डोळे झाकल्यानंतरही, आपल्या इच्छेनें पाहतात आणि आपोआपही पडतात. डोळे चित्र निर्माण करतात आणि मन वेड्यासारखं हरवून जात त्यात.

सर्व काही हरवून बसलेल्या हृदयाच्या कोपऱ्यात अपूर्ण राहिलेली एक इच्छा असते, मग रंगवतात डोळे चित्र, हरवतं मन आणि येतात परत हरवलेल्या त्या सगळया गोष्टी. अस्तिवात याचं मोल नसेल पण कल्पनेच्या जगात तरी हरवलेल्या गोष्टी मिळाल्याचं समाधान मिळतं. यातच आनंद सगळा. माझ्या प्रेमकथेत खूप महत्वाचं स्थान आहे अश्याच स्वप्नांचं.

खरंच मला वाटतं स्वप्न म्हणजे दुसरं जीवनच. आजन्म त्या चेहऱ्याची वाट पाहणाऱ्या दोन डोळ्यांना एवढं सामर्थ्य मिळतं ते या स्वप्नांपासूनच. कधीतरी येईल परतून वाटेवर या आशेत बसलेली मनं स्वप्न पाहत जिवंत असतात.

तसंच काहीतरी होतं माझ्या जीवनात. काजलला आठवून स्वप्न पूर्ण व्हायचे, स्वप्न गोड असायचे जरी अस्तित्व शून्य असले तरीही. मी वास्तवात जरी तिच्याशी भेटलो नसेल तरी आमची रोज भेट व्हायची त्या स्वप्नांत. कधी तिच्यासोबत

समुद्रकिनारी फिरायचं, तर कधी फुलांच्या बागांमध्ये, कधी प्रेमरंगात रंगायचं तर कधी मनसोक्त पावसात भिजायचं, कधी हातात माझ्या हात तिचा असायचा तर कधी जीव माझा आठवत तिला एकटंच बसायचा.

एकदा तर मला एक स्वप्न पडलं होतं. त्या स्वप्नात मी एक स्वप्न पाहत होतो आणि त्यात काजल होती. माझ्या मनात भावना तश्याच तिच्याही. मला जशी ती आवडायची तसाच तिला मी. एके दिवशी तिने तिच्या मनातील इच्छा माझ्यासमोर जाहीर केली आणि आमचं प्रेम बहरत गेलं. आमच्या विवाह सोहळयाचे चित्र स्वप्नात उभे, हे इथपर्यंतच थांबलं नाही तर अगदी मुलाबाळांपर्यंत.... शेवटी स्वप्नच ते अस्तित्वात मात्र काहीच नाही.

मी स्वप्न पाहत गेलो आणि प्रेमाच्या जाळयात गुंतत गेलो.

# प्रकरण पाच: पहिली कविता

माझ्या प्रेमाबद्दल खूप कमी लोकांना माहित होतं आणि मला कोणाला सांगायचं पण नव्हतं. मग मनातील भावना कागदावर उतरायला सुरुवात केली. काहीतरी लिहीत असे. पण विशेष असं काही आतापर्यंत नव्हतं. पण एका दिवशी काजलला डोळ्यासमोर आठवून ओळी लिहायला सुरुवात केली. आणि पहिली कविता तयार झाली.

हसणं तुझं किती ग गोड,
जेव्हा खळखळून हसतेस तू,
हसताना पाहून असं वाटतं,
परीहून सुंदर दिसतेस तू...

ते चेहऱ्यावरील भाव तुझ्या,
पाकळीहून कोमल दिसतेस तू,
तु सहज हसून जातेस मात्र,
फुलांना लाजवत असतेस तू...

वेणीतल्या फुलांनाही तुझा सुगंध,

इतक्या सुगंधात असतेस तू,
सुकतात ती फुले मात्र,
रोज फुलत असतेस तू...

श्रृंगार, दागीने तुझे गुलाम,
राज्य त्यांच्यावर करतेस तू,
नसतात आकर्षक बंद पेटीत,
आकर्षक त्यांना करतेस तू...

वारा झोके घेतो त्यात,
ते केस सावरत असतेस तू,
सोडतेस तू केस मोकळे,
अन वारा वेडा करतेस तू....

डोळयातही किती आश्चर्य तुझ्या,
डोळयांनीच बोलत असतेस तू,
पाहत बसतो मी डोळयांना,
प्रेम समजावत असतेस तू....

सतत डोक्यात विचार तुझा,
बावरं मनाला करतेस तू,

नाव ओठी येता प्रेमाच,
डोळ्यासमोर असतेस तू...

मी ही कविता मित्रांना दाखवली. त्यांना खूप आवडली. पण जिच्यासाठी लिहिलं तिला पाठवावी म्हणून फेसबुक उघडलं. पाहतो तर काजलच अकाउंट बंद झालेलं. काहीतरी दुसरं कारण असेल असं समजून, आता कॉलेज सुरु होईल तेव्हा देईल असं ठरवलं.

सुट्टीनंतर कॉलेज सुरु झालं. बारावीचं वर्ष असल्याने सगळे सिरीयस झाले. खूप ऐकलं होतं प्रेमात करियर खराब होतं पण माझं नशीब माझ्याबाबतीत असं काही आतापर्यंत तर झालं नव्हतं.

सर्व ठीक चालू होतं. रोज काजलला पाहायचं, तिला आठवून रोज काहीतरी लिहायचं. कधीकधी वाटायचं सगळं सांगून टाकावं तिला पण तिचं मन विचलित नको व्हायला आणि तर त्रास नको म्हणून मी कधीच काजलशी याबद्दल बोललो नाही. तिचं लक्ष अभ्यासात असावं हीच माझी इच्छा आणि म्हणूनच ती माझ्यापासून ह्रदयाच्या जवळ असूनही दूर होती.

ते वर्ष कधी संपत आलं काही कळलंच नाही. निरोप समारंभ असताना सुरजने काजलला सर्व सांगण्याचा सल्ला दिला पण मी ठरवलं, परीक्षा होईपर्यंत मी तिच्याशी याबद्दल काहीच बोलणार नाही. निरोप समारंभात मी एक कविता सादर केली, ती सर्वांना खुप आवडली.

काजल माझ्याकडे आली आणि स्वतःहून बोलू लागली.

काजल: शिवा मला माहित नव्हतं तू कविता लिहितोस आणि कविता खरंच खूप छान होती.

मी: म्हणजे आधी नव्हतो लिहीत पण आजकाल लिहीत आहे.

काजल: खुप छान. तुझ्या आणखी कविता असतील तर नक्की वाचायला दे कधीतरी असं बोलून गेली.

खरंच ना, मी लिहू शकलो काजलमुळे, मी लिहिलं तिच्यासाठी पण मी सांगु शकत नव्हतो.

# प्रकरण सहा : प्रोपोस

आता पार्टीचं स्वरूप सगळं बदलून गेलं. सर्वजण गंभीर होऊन शिवाची स्टोरी अनुभवत होते. तेवढ्यात शिव थांबला आणि खूप शांततेचं वातावरण निर्माण झालं.

इतक्यात दबक्या आवाजात दीक्षा बोलली. शिव मी खूप मुलं पाहिलेत प्रेमात अपयशी होऊन भलतेच व्यसन करतात. तू तर तसं काही नाही न केलास?

“आजही तिच्या डोळयापेक्षा जास्त नशा कोणत्याच व्यसनात नाहीये” शिवाने हसत उत्तर दिलं.

“ओहो... मग प्रोपोज वैगेरे केलं कि नाही आमच्या हिरोने काजल ला?“ चिकूने परत शिवाला त्याच्या कहाणीकडे वळवले.

“हो पण तो खूप हास्यास्पद होता. आजही मला हसू येतं त्याचं. खरं म्हणजे अगदी वेडेपणाच होता तो पण त्या ठिकाणी यापेक्षा दुसरा उपाय नव्हताच.”

“सांग तो पराक्रम यांनाही” हिनवत विशाल बोलला.

“म्हणजे कसं मोठ्या शहरात होतं तसं, कुठेतरी विशेष ठिकाणी भेटून काहीतरी गिफ्ट देऊन असा प्रकार झाला नव्हता. पण माझ्या भावना मला तिला सांगायच्या होत्या त्या मात्र पोहचल्या.

तेव्हा बारावीचा निकाल लागला आणि अपेक्षेप्रमाणे तिने प्रथम क्रमांक मिळवला. मीही टॉपर्स मध्ये होतो पण माझ्यापेक्षा जास्त मला काजलच्या यशाचा जास्त आनंद वाटत होता. सत्कार समारंभात भेटायचं आणि सगळं काजलला सांगायचं मी ठरवलं. त्या दिवसाची मी खूप आतुरतेनं वाट पाहत बसलो होतो. तिला खूप दिवसानंतर भेटणार होतो. तिच्यासाठी लिहिलेलं एक प्रेमपत्र आणि कविता सोबत घेऊन मी तयार होऊन कॉलेजकडे निघालो.

कॉलेज गेटवर सुरज सोबत थांबलो होतो इतक्यात काजल आली. लाल पंजाबी ड्रेस, केसांची नवीन हेअर स्टाईल, चेहऱ्यावरील तेच जीवघेणे भाव, गुलाबाच्या पाकळयासारखे तिचे ओठ, आणि डोळयांनी बोलणारे ते काळे डोळे.

जाताना माझ्याकडे पाहून तिने एक क्युट स्माईल दिली. मग तिच्या पाठीमागेच आम्ही सभागृहात गेलो. मी सारखा तिच्याकडेच पाहत होतो आणि ते तिलाही समजलं होतं आणि तीही माझ्याकडे पाहून हसत होती.

कार्यक्रम सुरु झाला आणि तो क्षण आला.

“यावर्षी ९२. २२ टक्के गुण मिळवून काजल सर्वप्रथम आली आहे” सरांनी घोषणा केली.

सर्व जण उभे राहून काजलच अभिनंदन करत होते आणि मी सर्वात जास्त खुश होतो.

एकमेकांशी बोलत आम्ही सर्व वर्गमित्र जमलो, ती थोडी थांबली होती सोबत तिची मैत्रीण पण होती.

“तू आज पक्का मरणार” असं बोलून सुरज मला तिच्याकडे ढकलत होता.

“अरे शिवा कसा आहेस? आणि अभिनंदन हा तुझं खूप छान मार्क्स आहेत तुला.”

“थँक यू. आणि आमच्या कॉलेज टॉपरचही अभिनंदन.” माझा आनंद चेहऱ्यावरून झळकत होता.

“थँक्स हं शिव. शेवटी बेस्ट फ्रेन्ड कोणाचीय मग?”

“माझी... मग आता आपण एकमेकांपासून दूर जाणार पुन्हा कधी भेटणार कोणास ठाऊक? तू मला विसरणार तर नाहीस न?”

“असं कोण बेस्ट फ्रेन्ड ला विसरतं का? तुच नको विसरु म्हणजे झालं.”

“मी तुला विसरु शकत नाही.”

“सॉरी. पण काजल तुला काहीतरी खूप महत्वाचं सांगायचं आहे, मला माहित नाही या ठिकाणी सांगणं बरोबर आहे कि नाही पण आज मी काहीच लपवू शकत नाही. तुला राग तर नाही न येणार?” भीतभीत मी तिला विचारलं.

“नाही येणार. तू बोल”

तिच्या चेहऱ्यावरील भाव दर्शवत होते मी काय बोलणार हे तिला आधीच माहित होते. पण आमच्याकडे पाहणाऱ्या मित्रमैत्रिणी मला अस्वस्थ करत होत्या आणि मी आधीच मोबाइल मध्ये टाइप केलेला मेसेज तिला वाचायला दिला.

Kajal, I'm going to disclose something that I have been concealing since long. I'm in love with you Kajal. I love you from bottom of my heart and you are EVERYTHING for me. I can't explain my life without you. Love you very much dear Kajal.

ती वाचत होती आणि मी तिच्या चेहऱ्याकडे पाहत होतो.

काजलने वाचून झाल्यावर माझ्याकडे पाहून खूप गोड स्माईल दिली.

नेहमी तिच्या चेहऱ्यावरील भाव वाचणारा मी मात्र आता मला काहीच समजत नव्हतं. तिचे बोलणारे डोळेही अबोल भासत होते. मी फक्त ती काय बोलते याची वाट पाहत होतो.

“तुला मी का आवडते?”

जगामध्ये चेहरे इतके, पण प्रेम तुझ्यावर होणं,
जगत तुला जागत रात्र, पहाट उजडून येणं,
माझं सारं आयुष्य आता, तुझंच होऊन गेलंय,
आवडतं मला आठवून तुला, स्वतःला विसरून जाणं....

नदी सागरास मिळून एकरूप होते तसं एकरूप व्हावं वाटतं तुझ्याशी. बरसणाऱ्या सरी शिवाय कसलं जीवन चातकाला? तसंच काहीस अस्तित्व आहे माझ्या जीवनाचं, माझ्या स्वप्नांचं आणि माझ्या आठवणींचं तुझ्याशिवाय.. म्हणून मला तू आवडतेस. कदाचित कवी म्हणून असं बोलायला हवं होतं. पण काजल समोर काही सुचलंच नाही.

"मला न तुझा स्वभाव खूप आवडतो, खूप लाजाळू आहेस तू, सर्वांना समजून घेतेस, सगळयांशी छान वागतेस, खूप प्रामाणिक आहेस, मला तुझ्या चेहऱ्यावरील भाव खूप आवडतात, आणि सगळयात जास्त म्हणजे तू खूप सिंपल आहेस. अगदी माझ्या स्वप्नपरीसारखी."

"थँक यु सो मच शिव !, खरं म्हणजे मलाही तू खूप आवडतोस, खूप छानही आहेस, आणि मला माहित आहे तू माझ्यावर खूप प्रेम देखील करतोस. मला माफ कर पण प्लिज मला थोडा वेळ हवा आहे."

मी एवढं ऐकूनच खुप खुश होतो, काही वेळ तर समजतंच नव्हतं काय बोलावं. हे नक्कीच माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त होतं.

“खरंच मला वाटलंच होतं कि तू मला समजून घेशील आणि हो तुला हवा तेवढा वेळ घे मी आयुष्यभर तुझी वाट पाहायला तयार आहे.”

“खूप छान वाटलं तुझ्याशी बोलून शिव. पण आता घरी जावं लागेलं मैत्रिणी वाट पाहत आहेत आणि खूप उशीर पण होत आहे. बाय शिवा...”

“बाय काजल. सी यु सून.”

ती माझ्यासमोरून जात होती पण काहीच वाटत नव्हतं कारण ती आज हृदयाच्या खूप जवळ आली होती.

मी पटकन सुरजला भेटून सर्वकाही सांगितलं, तोही खूप खूश होता माझ्यासाठी. मी तर भान हरवून बसलो होतो. सारखे तिचेच शब्द आठवत होते. त्या रात्री चांदण्याकडे पाहत तिला आठवत होतो.. कधी झोप लागली समजलंच नाही.

पण स्वप्नातही वाटलं नव्हतं कि ती आमची शेवटची भेट असेल.

# प्रकरण सात : इंजिनीरींग

त्यानंतर एकदाही तिच्याशी संपर्क झाला नाही आणि मी आणखी प्रतिक्षेतच होतो.

मग करियर हा विषय समोर आला आणि इंजिनीरिंग क्षेत्राबाबत विशेष आवड असल्याने इलेक्ट्रिकल इंजिनीरिंगला औरंगाबाद इथे प्रवेश घेतला. नवीन कॉलेज, नवीन शहर, नवीन मित्रमैत्रिणी. सुरुवातीला सगळं एकदम नवीनच.

होस्टेलवरील जीवन तर एकदम भारीच. मित्र म्हणजेच सर्व काही, रात्री उशीरपर्यंत रंगणाऱ्या गप्पा, मित्रांची प्रेम प्रकरणं, प्रेम प्रदर्शन करून लिहिलेले भिंतीवरील नावं आणि सगळ्या प्रकारचे नमूने मित्र. जीवनाला नवीन दिशा मिळालेली.

मोकळ्या वेळात कविता, शायरी आणि लिखाण क्षेत्रातील आवड वाढत गेली. नवीन पुस्तकं वाचायला आवडायची. लिखाणाची आणि वाचनाची सवयचं लागली. लिहायला तर कोणालाही येतं पण भावना तेव्हाच चांगल्या प्रकारे मांडता येतात जेव्हा आपण एखादी गोष्ट जगतो आणि अनुभवतो.

गावाकडे असताना चांदणे पाहत झोप लागायची. इथे तसं काही नव्हतं. पण पापण्यावरील “ती” चांदणी मात्र अजूनही तेवढीच चमकत होती.

वाटत तर असं होतं मी जीवन कमी आणि काजललाच जगत होतो. दिवसामागून दिवस सरत होते. अजूनही तिच्याशी संपर्क झालाच नव्हता. पण मनाला समजावत मी तिच्या आठवणींवरच प्रेम करत होतो.

इंजिनीरिंग लाइफ एकदम छान जात होती. पुस्तकासोबत जीवन शिकायचं असेल तर इंजिनीरिंगला प्रवेश घ्यावा. क्कॉलेजमधील विविध कार्यक्रमांत सहभाग घ्यायचो, खुप नवीन शिकायला मिळायचं. कॉलेज जीवनाचं स्वप्न छानपणे रंगत होते, खूप सुंदर मुली होत्या मात्र माझ्यासाठी काजल पेक्षा सुंदर कोणीच नव्हतं.

आमचं बोलणं होऊन वर्ष उलटून गेलं. नंतर मित्रांकडून समजलं काजल पुण्यात राहते तिच्या नातेवाईकांकडे आणि तिथे वैद्यकीय महाविद्यालयात MBBS करते. फक्त एवढंच वाटायचं कि एखाद्या दिवशी अनोळखी नंबर वरून फोन येईल आणि तिच्या आवाजात हॅलो शिव हा आवाज येईल. स्वतःपेक्षा जास्त तिच्यावर विश्वास असल्याने मी दुसऱ्या मुलींबद्दल विचारही करत नसायचो.

“मला खूप वेळा वाटायचं कि तू कोणावर तरी सिरीयस आहेस आणि म्हणूनच तू अजून सिंगल आहेस” मला थांबवत दीक्षा बोलली.

“तुझ्यासारख्या मुलाने सिंगल राहीलं तर आमच्च्यासारख्याच कसं होईल? आणि तू सिंगल हे थोडं वेगळं वाटतंय रे. म्हणजे एखादी वहिनी किंवा खूप जवळची असेल न कोणीतरी सांग खरं.. कळू दे सगळयांना” योगेश परत सुरु झाला.

सर्वजण हसत होते.

“ आता दुसरं प्रेम करायची हिंमत नाही रे आणि खरं प्रेम तर चुकूनही नाही “ शिवानेही हसत त्याला प्रत्युत्तर दिलं.

“अरे शिवा, म्हणजे तुझ्या आयुष्यात नसेल दुसरी कोणी पण तू कोणाच्या आयुष्यात गेलास का? म्हणजे आमच्या हिरोवर प्रेम करणारी कोणीतरी हिरोईन असेलच हो ना? “चिकूने आज माझी सगळी स्टोरी ओपन करायची ठरवलंच होतं वाटतं.

हा माझी एक खूप छान मैत्रीण आहे. तिला मी खूप आवडायचो पण सर्वच प्रेमांना यश मिळत नाही आणि कदाचित तिचंही त्यातील एक असावं.....

# प्रकरण आठ : अस्मिता

सगळेजण तयार झाले आणि शिवा पुन्हा सुरु झाला.

कॉलेज मध्ये स्नेहसंमेलनाची तयारी सुरु होती, मी सहभाग घेतला होता.

तिकडे गीतांचा सराव सुरु होता. माझ्या आवडत्या गीतांपैकी एका गीताचे बोल ऐकायला येतं होते.

मेरे दिल मे जगह खुदा की खाली थी
देखा वहां पे आज तेरा चेहरा हैं
मैं भटकता हुआ सा एक बादल हूं
जो तेरे आसमान पे आके ठहरा है.

अचानक कोणीतरी आवाज दिला, मागे वळून पाहिलं तर...

हॅलो शिवा, मी अस्मिता, सेकंड इयर, CSE.

खूप दिवसानंतर एवढा प्रेमळ आवाज ऐकला होता, क्युट चेहरा, काळा चष्मा, छोटेशे डोळे, हसताना गालावर पडणारी खळी, माझ्यापेक्षा थोडी कमी उंची,

अतिशय गोरी, हळुवार होणारी पापण्यांची उघडझाप, सगळी केस एका कडेला टाकलेली, एका हातानं चेहऱ्यावरील केस सावरणं, मॉडर्न लुक आणि तो फॅन्सी ड्रेस, तिचं अप्रतिम रूप मनमोहक होतं.

ओययय हॅलो, तू शिवाच ना?

एकततर तिचं घायाळ करणार सौंदर्य आणि वरून ती मला ओळखते हे पाहून मी तर आश्चर्यचकितच होतो.

“हा मीच शिवा.” मी चाचपडत बोललो.

“अरे तुझी क्लासमेट माझी मैत्रीण आहे, मला स्नेहसंम्मेलनात एक कविता बोलायची आहे त्यासाठी तिने तुला भेटायला सांगितलं होतं सो.”

“ठीक आहे. मी पण कविता सादर करणार आणि काळजी करू नको तुला नक्की संधी मिळेल.”

“थँक्स शिवा. बायदवे, मला तुझा मोबाइल नंबर दे.”

अस्मिताकडे पाहून समजत काही नव्हतं पण नक्की काहीतरी वेगळं घडतंय असं वाटत होतं.

“हा घे ९६७........”

“कूल, मी करते रात्री व्हाट्सअप तुला.”

दिवसभर मनात अस्मिताचाच विचार चालू होता,  व्हाट्सअप उघडून मी तिच्या मेसेजची वाट पाहत बसलो होतो. तिने आमच्या कॉमन फ्रेंन्डच नावही नव्हतं सांगितलं.

ती खूप जास्तच वाट पाहायला लावत होती. साडेबारा वाजता एका अनोळखी नंबर वरून एक मेसेज आला.

Hi Shiva, Extremely Sorry, I was little bit busy Yar.

अस्मिताचा मेसेज होता.

मी:अरे ठीक आहे. त्याचं काही नाही.

अस्मिता: झोप तर नाही ना आली? म्हणजे मी डिस्टर्ब तर नाहीये ना करत?

मी: नाही तू बोल. मला उशिरा झोपायची सवय आहे.

अस्मिता: अच्छा गर्लफ्रेन्ड ऑनलाईन असेल ना सो.. हो की नाही?

मी: अग मी सिंगल आहे.

अस्मिता: गप्प आता हं, खोट नकोस बोलू. माझ्या मैत्रिणीने सांगितलंय तुझ्याबाबद्दल. मला वेड्यात नको काढू.

मी: आता कसं सांगू तुला?

अस्मिता: काही सांगायची गरज नाही. आणि हो मी तुझ्या कविता वाचल्या. काय लिहितोस यार तू.  फॅन झालीये मी तुझी.

मी: थँक यु व्हेरी मच ! पण तू वाचल्यास कुठे?

अस्मिता: तुझ्या फ्रेंन्डने पाठवल्या होत्या आणि तुला कोणती कविता आवडते? मला पाठव बरं.

मी:

कोई दीवाना कहता है, कोई पागल समझता है,
मगर धरती की बैचेनी, बस बादल समझता है,
मैं तुझसे दूर कैसा हु, तू मुझसे दूर कैसी है,
ये तेरा दिल समझता है, या मेरा दिल समझता है.

अस्मिता : ग्रेट ! मला पण आवडते. सेम चॉइस.

खुप जुनी मैत्रीण असल्यासारखं अस्मिता माझ्याशी बोलत होती. तिचा स्वभाव खुप मनमोकळा आणि छान होता. अस्मिताशी बोलताना कधी तीन वाजले समजलंच नाही.

अस्मिता: तू तर झोपणारच नाहीस वाटतं आज. तुझ्याशी खूप बोलायचंय, दुपारी १ वाजता, कॉलेज कॅन्टीन ओके ना? तसंही तुला मी कॉल करेनच. सॉरी यार पण खुप झोप येतेय.

मी: ठीक आहे बाय. आपण भेटू लवकरच.

असं अचानक अस्मिताच जीवनात येणं काय होतं मला माहित नाही पण तिच्यात मला एक चांगली मैत्रीण दिसत होती. जीवनात विशेष घडणार असावं याचा विचार करत झोपलो.

# प्रकरण नऊ: A फॉर अस्मिता.

आमची कॅन्टीन मध्ये भेट झाली. डायरी समोर ठेवत अस्मिता बोलली.

ती: ह्या सर्व माझ्या कविता आहेत आणि तुला माझ्यापेक्षा जास्त अनुभव आहे म्हणून तू निवडशील ती कविता मी स्नेहसंमेलनात सादर करेन.

मी :बरं मला सांग यातील  तुझी सगळ्यात जास्त आवडती कविता कोणती?

ती : तश्या सगळ्याच आवडतात मला, पण खरं तर मला तुझी कविता खूप आवडते. बोल आता.

मी : अगं माझ्यापेक्षा तू छान लिहितेस. माझ्यापेक्षा जास्त तुझ्या कविता आहेत.

ती: गप्प हं आता. तू आणि तुझ्या कविता लोकप्रिय आहेत, कितीतरी मुली तुझ्या फॅन्स असतील न? मला कोण ओळखत पण नाही आणि म्हणे की मी तुझ्यापेक्षा छान लिहिते.

मी :ओहह असं का? एक काम करू मग आपण दोघे मिळून एक कविता लिहू आणि ती स्नेहसंमेलनात बोलू? ठीक आहे आता?

ती : अरे बापरे !.. खरंचं.. मजाक नको करू ह. अय्या तुझ्यासोबत कविता आणि तेही स्न्हेसम्मेलनात माझं नशीब असेल. मी कधीच विचार नव्हता केला. मी तयार आहे. पण कविता कशी आणि कधी लिहायची.

मी : वेळ खूप आहे. दररोज थोडी थोडी लिहायची.

अस्मिता एकदम खुश आणि उत्सुक होती. आम्ही खूप वेळ बोलत बसलो. माझं कॉलेजमधे असून बंक झालेलं ते पहिलं लेक्चर.

नंतर स्नेहसम्मेलनात आमची “चांदणी की चंद्र? “ ही कविता सर्वांना खुप आवडली. अस्मिता खुप खुश होती. आम्ही आता खुप छान मित्र झालो होतो.

**२० मार्च..**

अस्मिताचा वाढदिवस, मी फोन हातात घेऊन, तिचा नंबर डायल करून बसलेलो कधी एकदाचे बारा वाजतात आणि पहिला कॉल माझा असेल असं वाटत होतं. कॉल केला आणि लगेच अस्मिताने उचलला, कदाचित तिला माझ्या कॉलची अपेक्षा होती. मी वाढदिवसाचा शुभेच्छा दिल्या आणि दुपारी भेटायला बोलवलं. वाढदिवसानिम्मित काहीतरी स्पेशल करायचं हा माझा प्लॅन होता. एक छान गिफ्ट तिच्यासाठी आधीच घेऊन ठेवलेलं आणि अस्मितावर लिहिलेली एक कविता घेऊन मी भेटण्यासाठी निघालो. वेळेच्या आधी शॉप मध्ये जाऊन मी तयारी

केली होती. अस्मिता आली आणि पाहतो तर काय? गुलाबी पंजाबी, केस बांधलेली आणि एकदम साधा लुक. ती स्पेशल दिवशी खुप स्पेशल दिसत होती.

नंतर वाढदिवस साजरा झाला, तिला गिफ्ट खूप आवडलं आणि मी तिला डेडीकेट केलेली कविताही. नंतर तिने तिच्या वाढदिवसाच्या केकचे फोटो दाखवले त्यावर माझं नाव असंण यात आश्चर्य काही नव्हतं पण त्या दिवशी कदाचित मी अस्मिताला आवडत असेल असं वाटलं होतं. अस्मिता पण माझ्यासाठी ती एक खूप छान मैत्रीण होती फक्त एवढंच मला माहित होतं.

अस्मिता एकदम मनमोकळी, सर्व सांगायची आणि मला खुप समजुन घ्यायची. आमचं भेटणं दररोजचं झालं. लेक्चर बंक करायला तिला खुप आवडायचं, मलाही तिने सवय लावली. तिच्यासोबत लेक्चर सोडून फिरायला जाणं, कॅन्टीन मधील गप्पा, लायब्रेरी मधील सोबत अभ्यास, रात्री उशिरा येणारे कॉल्स सगळं खुप भारी...

नंतर मला तिच्या नावाने आणि तिला माझ्या नावाने चिडवायला सुरुवात झाली. आमच्या प्रेमप्रकरणाच्या अफवा कॉलेजमधे पसरायला सुरुवात झाली.

अस्मिता माझ्यात काय पाहत होती कोणास ठाऊक पण ती माझी सगळ्यात जास्त जवळची मैत्रीण. वाईट प्रसंगी तिची मैत्री सावली द्यायची तर

आनंदात तिचं हसणं प्रोत्साहन.  तिच्या मैत्रीमुळे माझ्या कॉलेज जीवनाच्या ABCD मधील म्हणजे अस्मिता अस्मिताच..

# प्रकरण दहा : तो रविवार

फोनवरती दोन कॉल्स आले, आठ वाजले तरी मी झोपेतच होतो इतक्यात एक अस्मिताचा मेसेज आला. आज दुपारी २ वाजता कॉलेज जवळील कॉफी शॉप मध्ये भेटू.

मी हा येतो रिप्लाय देऊन परत झोपलो.

मला वाटत होते रोज भेटतो तशीच भेट असेल.

परत ११ वाजता अस्मिताने कॉल करून भेट पक्की केली.

मी अगदी वेळेवर तिथे पोहचलो. कॉर्नर चेअर वरती अस्मिता वाट पाहत बसली होती मागे वळून तिने एक स्माईल दिली. आज ती खूप जास्तच सुंदर दिसत होती आणि तिच्या चेहऱ्यावरून ते साफ झळकत होतं.

मी लेट तर नाही ना झालो?

अरे नाही बस. मी पण आताच आले.

ओके मग.  आज काहीतरी स्पेशल आहे वाटतं.

हो आज खूपच स्पेशल दिवस आहे. सिल्क आणि रेड रोज माझ्या हातात देत अस्मिता बोलली.

शिव,

मला माहित नाही आपली भेट होण्यामागे कारण काय होतं? पण तुला भेटल्यापासून जीवन खूप बदललंय. मी आधीही कविता लिहायचे पण तू भेटल्यापासून मी कविता जगायला लागले. आधी माझं जीवन एवढं स्पेशल नव्हतंच जेवढं तू बनवलास. असं वाटतं तुझ्या हसण्यामागचं कारण मी असावं, तू उंच भरारी घेणारा आकाशातील पतंग त्याची दोर मी असावं, तू प्रकाशी दिवा तर त्यातील वात मी असावं, तू चंद्र रात्रीचा तर ती जवळची चांदणी मी असावं, उगाचच रूसावं तुझ्यावर आणि तू समजूत काढावीस, असं वाटतं तुझ्या कवितांना ऐकत जन्मभर बसावं. खरं तर ना आता हातांना पण वेड लागलय रे. वाटतं हातभर मेहंदी काढावी आणि त्यात नाव तुझं लिहावं. मी तुझ्यावर खूप खूप प्रेम करते आणि आयुष्यभर तुझ्याचसोबत राहील.

हे सर्व ऐकून काय बोलावं, मला काही सुचत नव्हतं. कितीतरी विचारांची वादळे डोक्यात एकदाच फिरत होती. काजलचा चेहरा डोळयासमोर उभा होता आणि अस्मिताला होकार देण्याची माझी हिंमत नव्हतीच आणि तिला स्पष्टपणे नकार देण्याची माझी ईच्छा नव्हती. तिला कसं उत्तर द्यावं मला काही समजत नव्हतं.

माझी अवस्था पाहून अस्मिताला सर्व समजलंच. तीही अबोल होऊन माझ्याकडे पाहत होती.

हे बघ अस्मिता, मी तुला कसा नकार देऊ आणि माझ्याकडून एक चूक झालीये, मी तुला सगळं सांगणारच होतो पण योग्य वेळ कधी भेटलीच नाही.

आतातरी सांगशील कि अजून योग्य वेळ शोधत बसला आहेस.

खरं म्हणजे अस्मिता मला तू खूप आवडतेस, तुझा स्वभावही खूप छान आहे आणि तू  माझी खुप जवळची मैत्रीण आहेस. पण याआधी मी एका मुलीवर प्रेम करायचो आणि अजूनही तिच्या उत्तराच्या प्रतीक्षेत आहे.

कोण ती लकी गर्ल? स्वतःच्या भावना लपवत मला अस्मिताने विचारलं.

मी काजल बद्दल अस्मिताला सगळं सांगितलं. काजलचं माझं आयुष्यात येणं, आमची मैत्री होणं, मला तिच्यावर प्रेम होणं, आणि आमचं एकमेकांपासून दूर जाणं. तिला सर्व सांगितलं.

अस्मितांचे डोळे पाणावले होतो. तिच्या डोळयात अश्रू का होते ते मला समजच नाही.

वेडा आहेस रे शिव तू, असं वाऱ्याच्या झुळूकेवर कोणी प्रेम करत का? आणि तेही एवढं खरं.

मी खरंच वेडा होतो, मला अस्मिताच्या शब्दांचा अर्थ समजत नव्हता आणि तिच्या अश्रूंचाही. थोडा वेळ मीही अबोल झालो आणि अस्मिताही.

मला माहित होतं शिव तू नाही बोलणार नाहीस पण मीच सर्व समजून घेतलंय. मी समजू शकते तुला आणि तुझ्या प्रेमालाही पण मला आज एक प्रॉमिस कर कि तू काजलला मिळवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करशील.

हो मी तुला प्रॉमिस करतो. अस्मिता खरंच तू मला खूप काही शिकवलंस. मला तू खूप आवडतेसही पण लाईक आणि लव मध्ये खूप फरक आहे आणि तू मला नेहमी समजून घेतेस तसं आजही घेशील. मी तुला प्रॉमिस करतो की, आयुष्यभर मी तुझा बेस्ट फ्रेंड म्हणून तुझ्या सोबत असेन.

हो का बरं बरं थँक यु, आणि तुझा आता आणखी एकदा रडवायचा विचार असेल तर आधीच सांग तसं.

अगं खरंच बोलतोय मी.

मला माहित आहे रे आणि मी तुला जाऊही देणार नाही तुझी इच्छा असली तरी. बरं चल आता बाळा मला घरी जावं लागेल.

बोलत बोलत पाच कसे वाजले समजलंच नाही.

मी तिला परत सॉरी बोललो.

अरे हो ना आता बस झालं. चल आपण रात्री बोलू. बाय आणि हो सावकाश जा बरं का. नाही तर वाऱ्याची झुळूक येईल एखादी.

ती मस्करी करत होती पण मला तिच्या भावना समजत होत्या. पण माझ्याकडेही पर्याय नव्हताच. वेळ कशी कठोर होते याची जाणीव मला होत होती.

माझ्या आयुष्यातील कठीण दिवसातील तो एक दिवस होता. मी विचार करत करत विजयकडे गेलो त्याला सर्व सांगितलं.

शिव्या तू आज माझ्या शिव्या नक्कीच खाणार बघ. ऐकलं होतं लोक प्रेमात अंध असतात पण तू तर पूर्ण अपंग आहेस रे. आधी वाटायचं पण आज समजलं तू नक्की डोक्यावर पडला होतास. अरे ती अस्मिता, एकदा नीट पहा. कितीतरी मुलं तिच्या पाठीमागे, तरी ती तुझ्यावर प्रेम करते. खरंच मुली पण वेड्या आहेत आजकाल. काय पाहीलं असेल तुझ्यात देव जाणे. अरे वेळ आहे तुझ्याकडे नवीन सुरुवात कर तू त्या मुलीच्या शोधात आहेस जिच्यासाठी तू काहीच नाहीस. तुला एक मेसेज करायला वेळ नाहीये तिच्याकडे आणि एकीकडे अस्मिता जी आयुष्यतुझ्या नावावर करायला बसलिये. कधी कळणार तुला” रागात तो मला समजावत होता.

विजय खरं सांगत होता, पण माझा विश्वास प्रेमावर होता. मलाही कधीकधी वाटायचं सोडून दयाव सगळं पण कोणतीही गोष्ट सोडून देण्याआधी आपण का धरून बसलो होतो हा विचार केल्यावर सोडून खुप जास्त अवघड असतं...

माझ्याबाबतीत तेच होत होतं.....

# प्रकरण अकरा: अविस्मरणीय भेट

मी रात्री खुप वेळ विचार करत बसलो, सुरजचे शब्द आठवत होते. एक क्षण वाटलंही, जाव विसरून सगळं आणि करावी नवी सुरुवात पण मन मात्र काहीच ऐकायला तयार नव्हतं. अस्मिता खुप छान मैत्रीण माझी पण प्रेमाचा विचार पटत नव्हता.

मला अस्मिताची काळजी वाटत होती आणि झोप येत नव्हती इतक्यात अस्मिताचा मेसेज आला.

सॉरी शिवा, मला काजलबद्दल माहित नव्हतं. तसं तर तुझ्यावर प्रेम मी खुप दिवसांपासून करायचे पण तुला आधी बोलून दाखवलं नाही. तू मला सर्व सांगितलस पण काजल विषयी सांगायचं विसरलास. प्लीज काळजी नको करू मी एकदम ठीक आहे आणि मला माफ कर माझ्यामुळे तुला परत सगळं आठवावं लागल.

मला उत्तर काय दयाव समजत नव्हतं. मी अस्मिताला भेटून बोलाव असं ठरवलं. माझा रिप्लाय फक्त हा होता " "भेटु सकाळी १० वाजता, शिव मंदिर"

नियमितपणे मी या मंदिरात येत असतो. कधी निराश तर कधी आनंदात. माझी देवावर खुप श्रद्धा आहे. देवाकडे मी खुप काही मागतो माझे दुःख मी सांगतो. नेहमीच

मला परिस्थितीशी लढायचं सामर्थ्य मिळतं. आज मला सगळयात जास्त त्याची गरज आहे.

मंदिराच्या परिसरात अस्मिताची वाट पाहत बसलो आणि थोड्याच वेळात अस्मिता आली आणि आमच संभाषण सुरु झालं.

मी: कुठून सुरु करावं काही समजत नाहीये.

ती: कर कुठूनतरी. माझे डोळे बोलत नाहीत रे.

मी: अग, मी एवढा गंभीर आहे आणि तू टोमणे मारत आहेस.

ती: अरे चिल यार. हे बघ मी हर्ट वगैरे झालिये असं समजू नकोस. तुझ्याप्रेमबद्दल समजल्यावर मी खुप विचार केला. माझं प्रेम तुझ्याप्रेमापुढे काहीच नाही. तू तुझं प्रेम मिळवायचा प्रयत्न सुरु ठेव, आणि हो मी आता एकदम ओके आहे.

मी: तुझ्या चेहऱ्यावरुन दिसत आहेच पण मनात काही नको ठेऊ प्लीज.

ती: नाही रे बाळा.. खरंच तुझं मन एखाद्या लहान बाळासारखं आहे. खुप हट्टी, निष्कपट, साध आणि मोकळ. कोणाला त्रास देऊ वाटत नाही आणि प्रेम तर एवढं करतोस की प्रेम शब्दाचा अर्थ तुझ्याकडे पाहून कळेल. मला खरं सांग. तुला त्रास होत नाही का कधी काजलच्या तुझ्याशी वागण्याचा?

मी: कधीकधी वाटायचं काजल मला संपर्क करू शकली असती पण तिच्या मनात काही नसेल. कधी वाटायचं तिला काही मर्यादा असतील. म्हणजे एक प्रश्न समोर आला की त्याला दुसऱ्या प्रश्नांनी उत्तर देत मनाला फसवत ठेवायचं. अगदी खरं म्हणजे 'त्रास होतो पण माझ्या काजलवरील प्रेमासमोर त्रास शून्य आहे. '

ती: ग्रेट यार. तिला दूसर कोणी आवडत असेल तर मग?

मी: अगदी तुझ्यासारखं दिलदार होईल आणि तू केलस तेच करेंन.

ती: ओह! लग्न करणार का मग काजलशी?

मी: हो यात शंका नाही.

ती: कास्ट सारखी आहे का तुमची?

मी: नाही पण प्रेमापुढे कास्ट वैगेरे मला तर काही वाटत नाही. प्रेम हाच सर्वात मोठा धर्म.

ती: खरंच यार शिवा, काजल खुप लकी आहे. तिच्यावर एवढं प्रेम करणारं कोणीतरी आहे. तेही तुझ्यासारखा मुलगा. नशीब आहे यार. मला विश्वास आहे ती तुझ्यावर खुप प्रेम करते. फक्त तिला काही थोडीशी अडचण असेल. पण तुला नक्की मिळेल असं माझं मन बोलत आहे.

मी:थैंक्स यार आणि हो, अस्मिता खरंच सॉरी यार मी तुला सगळं सांगायला हव होतं. पण माझ्याकडून उशीर झाला काजलबद्दल सांगायला.

ती: इट्स ओके रे शिव. असंही मी खुप दिवसांपासून तुझ्यावर प्रेम करते. तू काजलबद्दल सांगितल असतंस तर फक्त मी माझं प्रेम तुला सांगितलं नसतं. फक्त एवढंच.

मी: प्लीज, मला समजुन घे.

ती: अरे वेड्या, तुला सांगितल ना मी ठीक आहे. हो तुझं प्रेम भेटलं असतं तर...  पण तू आणि काजल एकमेकांसाठी आहात आणि तुझ्याकडून मला खुप काही मिळालय. मी माणस ओळखायला नेहमी चुकत असे. चुकीचे माणस निवडून कोणावर पण विश्वास करत असे पण काल मला समजलं माझी तुझ्याबाबत निवड एकदम परफेक्ट होती. म्हणजे मी माणस ओळखायला शिकले. तुझी मैत्री माझ्यासाठी खुप आहे. आता फक्त माझी तुला काजल मिळावी हीच इच्छा आहे.

मी: मी प्रॉमिस केल ना तुला आणि आता काजलवर अवलंबुन आहे सगळं.

ती: नक्की मिळेल. काजल मिळाल्यावर मला विसरून जाशील ना?

मी: शक्यच नाही. तुच तुझ्या लग्नानंतर मला विसरशील.

ती: काहीही हा. गप्प तू. मी तुला विसरणार नाही आणि तुला विसरु पण देणार नाही. तू माझा लाइफ टाइम मित्र आहेस.

मी: हा. आपली मैत्री अशीच आयुष्यभर बहरत जाईल.

नंतर आम्ही दर्शनाला गेलो. देवालाच माहिती अस्मिता देवाकडे काय मागत होती. मी मात्र देवाकडे अस्मिता आणि तिची आयुष्यभरासाठी मैत्री मागत होतो.

आज आमची मैत्री वेगळयाच उंचीवर पोहचली होती. आम्ही खुप वेळा भेटलो पण आजची भेट अविस्मरणीय होती.

आता वाढदिवसाच्या पार्टीमधील सगळे शिवाची स्टोरी ऐकून भावुक झालेले.

“शिवा तू खरंच खुप लकी आहेस. तुला एवढं छान क्रश आणि अस्मितासारखी मैत्रीण आहे. तू सहन पण खुप केलस. तुला तुझं प्रेम नक्की मिळेल. आम्ही सर्व तुझ्यासोबत आहोत. प्रियंका बोलली.

सर्वजण स्टोरीचा शेवट ऐकायला उतावीळ झाले होते.

शिवा त्याच्या प्रेमकथेच्या अंताकडे वळला.

# प्रकरण बारा:  स्वल्पविराम

प्रेम....

अडीच अक्षराचा शब्द पण जग झुकवण्याची ताकद. प्रेम मिळवण्यासाठी आयुष्य वेचणारेही आहेत आणि मृत्युनंतरही अपयशी असणारेही. प्रत्येक नात प्रेमावर टीकून आहे. कधीकधी मग गैरसमज होतात पण गैरसमज दूर करण्याऐवजी नात दूर करन आणि हृदयाजवळची माणसं गमावण हे कितपत योग्य याशी सर्व परिचित आहोत. असं का होतं बरं? कारण असं की आपण आपल्याच बाजुशी धरून असतो पलिकडील बाजू तशीच राहते अनोळखी.

या जीवनाची वाट चढ-उताराची, वेड्यावाकडया वळणांची, उन सावलीची आणि अडथळयांची आणि या अडथळयांमुळेच यशाचा आनंद द्विगुणित होतो. परिस्थितीसमोर अडथळयांशी लढताना गूढघे टेकुन बसणारा मी नाही, कदाचित मी चुकीचाही असेल पण क्षितीज कवेत घेण्याची स्वप्न ठेऊन जगतो मी.

खरे पाहता, तुमच्यात किंवा तुमच्या आजूबाजूला शिवा, काजल आणि अस्मिता असतील. प्रेमातील वादळांशी लढत विश्वासाच्या मातीत पाय रोवून. मग सर्वांच प्रेम यशस्वी होईल असं नाही. ओठांवरती शब्द येऊनही परिस्थिती बोलू देत नाही आणि मग काही गोष्टी अपूर्ण राहतात आणि तश्याच बऱ्या असतात. ज्याला आपण सर्व काही समजतो, तेच उरत नाही पण अश्यावेळी व्यसनाच्या आहारी जाणं,

ईजा करून घेणं, जीवन संपवणं हे योग्य नाहीच. असं करून प्रेम प्रदर्शन करणं म्हणजे तर मुर्खपणाच!

एका दिवशी शिवाचं प्रेम काजलला नक्की समजेल.. तो एक दिवस ज्याची मी आतुरतेने वाट पाहतोय नक्की उजडेल कारण माझा प्रेमावर आणि देवावर विश्वास आहे. आम्ही दूर आहोत याच काही कारण असेल कदाचित तिने मी एकीकडे आणि परिवार एकीकडे ठेऊन विचार केला असेल आणि परिवार निवडला असेल. जर असं काही असेल तर माझ्या मनातील तिची उंची आणखी वाढली. तिच्या याच परिपक्वतेवर प्रेम करतो मी.

एक प्रश्न समोर येतो, तिला काहीतरी एक का निवडाव लागेलं? साहजिकच याच कारण म्हणजे समाज. प्रेमविवाह म्हणजे गुन्हा ही मानसिकता आहे. मी समजू शकतो माणसं ओळखणं सोप्प नसतं. आजकाल ह्रदयात डोक घेऊन फिरणारे लोकही आहेत. मग या अलहड़ वयात चुकीची निवड होऊन पालकांना निवडीवर शंका येणं साहजिकच आहे आणि तेही त्यांच्या प्रेमापोटीच. शिवाय टाइमपास नावाचा आजार आहेच की प्रेमाला. एकमेकांच्या भावनांशी खेळणं सुरु आहे आणि त्याचे दुष्परिणाम ही समोरच आहेत.

माझ्याकडून खुप काही चुकलं असेल. हो, अजुन मी जगायला शिकतोय.

**शेवटी प्रेमात सगळं क्षम्य असतं.**

आता तुम्ही सर्व या शिवाच्या प्रेमाशी परिचित आहात. इतरांसारखं मीही खुप काही गमावलं असेल. पण आज आयुष्यात मी मागे वळून पाहतो मला खुप रंगीबेरंगी आयुष्य दिसत. आमच्या गोड आठवणी आणि भावना यांची बरोबरी जगातील कोणतीच संपत्ती करू शकत नाही. मला ती मिळेल की नाही हे माहित नाही पण मी प्रामाणिक प्रयत्न करणार एवढं मात्र नक्की. हे दोन डोळे स्वप्न पाहतात तेच स्वप्न आमचे चार डोळे पाहतील एवढी आशा मी आशावादी असल्याने करतो.

एक सांगायचं राहिलं,

फोन वाजत होता, एका अनोळखी नंबर वरुन कॉल होता. मी उचलला आणि तिकडणं आवाज आला.

हॅल्लो शिवा, ओळखलंस ना? विसरला तर नाहीस ना?

हा आवाज खुप ओळखीचा होता. इतक्यात उठलो पाहतो तर काय ते एक स्वप्न होतं पहाटे पडलेलं. गावाकडे म्हणतात पहाटे पडलेलं स्वप्न खरं होतं. चला, आशा ठेवायला काय हरकत?

इथे या प्रेमाच्या आणि स्वप्नांच्या प्रवासाला स्वल्पविराम देतोय, मग हा स्वल्पविराम असेल की पूर्णविराम काजलची अबोल बाजू ठरवेल.

शेवटी मी स्वतःला सिध्द करेन, माझ्या क्षेत्रातील उंची गाठून काहीतरी करून दाखवेल आणि अश्या ठिकाणी असेल जिथे जात आणि विषमता यांसारख्या अडथळयांची किंमत शून्य असेल आणि मग फक्त आम्ही राहु...

# ती, मी आणि प्रेम.

मार्गदर्शन आणि प्रोत्साहन: केदार मुंडे, ओमकार झांजे, निखिल, दीक्षा, रेणुका, ज्ञानेश्वर, विजय आणि सचिन.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन
सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान